# मुक्या प्राण्यांचे जगणे सुधारण्यासाठी दररोज बदल घडवून आणणे

**मुक्या प्राण्यांना मदत करण्यासाठी लहान मुलांना शिक्षक अनेक मार्गांनी मदत करू शकतात. काही कल्पना येथे दिल्या आहेत:**



१. आपल्या अधिकृत अभ्यासक्रमाचा भाग म्हणून दयाळू नागरिकांचा समावेश करण्यासाठी शाळेला प्रोत्साहित करणे.

२. शाळेच्या अधिकाऱ्यांना सांगा की, मुलांना निसर्ग सहलींसाठी प्राणी संग्रहालये आणि सर्कशींमध्ये नेले जाऊ नये म्हणून धोरण अवलंबणे. प्राण्यांना पिंजऱ्यांमध्ये ठेवलेले असताना किंवा साखळ्यांनी बांधलेले असताना त्यांना वाईट वागणूक दिली जाते तसेच, सर्कशींमधील प्राण्यांनी त्यांच्या मालकांचे ऐकावे आणि नको असतानाही काही कृती करून दाखवण्यास भाग पाडण्यासाठी त्यांच्यावर हिंसा केली जाते. प्राण्यांना प्राणी संग्रहालयामध्ये आणि सर्कशींमध्ये एकटे, उदास आणि त्रासदायक वाटू लागते. त्याऐवजी जवळपासच्या प्राण्यांच्या निवासाला किंवा अभयारण्याला भेट दिली जावी.



३. शाळांच्या अधिकाऱ्यांना शाळेच्या गणवेशामध्ये बदल करून कातडी बुटांऐवजी कॅनव्हासच्या बुटांचा अवलंब करण्याची कळकळीची विनंती केली जावी. कातड्याचे उत्पादन केवळ दुष्टकृत्य नाही तर ते पर्यावरणाची देखील हानी करते. प्राण्यांच्या कातड्याचे वापरण्यायोग्य चामड्यामध्ये रूपांतर करताना विषारी रसायनांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो, व त्यांचा नद्या किंवा जलाशयांमध्ये निचरा केला जातो ज्यामुळे ते दुषित होतात.

४. तुमच्या शाळेला विनंती करा की, केवळ चविष्ट शाकाहारी अल्पोपहार आणि दुपारचे जेवण पुरवण्यास प्रवृत्त करत एक पोषक–आहार कार्यक्रम राबवायला घ्या. कल्पना, सूचना आणि पाककृतींबद्दल माहिती मिळवण्यासाठी Info@compassionatecitizen.org वर आमच्याशी संपर्क साधा.

५. लहान मुलांना काचेची भुकटी लावलेल्या धारदार किंवा धातुयुक्त मांजांऐवजी सुती मांजांचा वापर करून ''प्रेमळ पतंग'' उडवण्यास प्रवृत्त करण्यासाठी मुख्याध्यापकांसोबत काम करा. हे धोकादायक मांजे दरवर्षी कित्येक पक्ष्यांना आणि माणसांना जखमी करतात किंवा त्यांचा जीव घेतात.



६. शाळांमध्ये प्राण्यांना पाळण्यास मज्जाव करणारे धोरण आखण्यास अधिकाऱ्यांना प्रवृत्त करावे. प्राण्यांना शाळेमध्ये ''पाळीव'' म्हणून ठेवल्यास त्यांच्याकडे दुर्लक्ष होऊ शकते आणि उद्देश नसतानाही शाळकरी मुलांकडून त्या प्राण्यांचे हाल होऊ शकतात ज्यासाठी त्यांचे अजाणतेपण किंवा शिक्षकांचे व्यस्त राहणे कारण बनू शकते. वर्गांमध्ये पाळीव प्राणी असणे हे प्राण्यांच्या खरेदी–विक्रीला समर्थन देणारे ठरते ज्यामुळे प्राण्यांच्या बेजबाबदारपणे आणि स्वयंस्फूर्त खरेदीस प्रोत्साहन देते.

७. लहान मुलांना प्राण्यांच्या हक्कांसाठी बोलणारा क्लब चालू करण्यास प्रवृत्त करावे आणि प्राण्यांना योग्य वागणूक मिळावी, त्यांना खाल्ले जाऊ नये किंवा त्यांच्या चामड्याला परिधान केले जाऊ नये अशा विषयांबद्दल चर्चा घडवण्यात पुढाकार घ्या.

८. आंतरराष्ट्रीय प्राणी हक्क दिवस (१० डिसेंबर), वसुंधरा दिन (२२ एप्रिल) आणि जागतिक पर्यावरण दिन (५ जून) अशा विशेष पर्वण्या प्राण्यांच्या समस्यांची चर्चा घडवण्यासाठी संधी म्हणून वापराव्यात.

९. रस्त्यावरील भटक्या प्राण्यांना चांगली वर्तणूक द्यावी आणि त्यांच्यासाठी व पक्ष्यांसाठी वाडग्यात पिण्याचे पाणी ठेवण्यात यावे यासाठी लहान मुलांना प्रोत्साहित करावे.

१०. प्राण्यांच्या हक्कांसाठी दर्शनीय पाट्या तयार कराव्यात.

११. प्राण्यांच्या समस्यांबद्दलची पत्रके वाटणे तसेच प्राण्यांच्या हक्कांबद्दल एकमेकांशी बोलण्यासाठी शाळेचे उत्सव, पालक–शिक्षक सभा आणि इतर समारंभांमध्ये एक माहितीपर टेबल ठेवावे. संबंधित सामग्रीचा पुरवठा मागवण्यासाठी वर Info@compassionatecitizen.org आमच्याशी संपर्क साधा.



१२. प्राणी–संरक्षण समस्यांबद्दल चर्चासत्रे, पोस्टर बनवण्याच्या स्पर्धा आणि निबंध स्पर्धा भरवण्यास लहान मुलांना प्रोत्साहन द्या.

१३. लहान मुलांनी प्लास्टिकचा वापर टाळण्यास त्यांना प्रवृत्त करा! प्लास्टिकच्या पिशव्या हजार वर्षांपर्यंत जमिनीत तशाच राहतात, हे तुम्हाला माहीत होते का? प्लास्टिकचा कचरा गाई, म्हशी अशा भटक्या प्राण्यांच्या खाण्यावाटे त्यांच्या पोटात जातात आणि ते दरवर्षी अनेक जलचर जीवांच्या अस्तित्वाला देखील घातक ठरते.

१४. तुमच्या परिसरातील भटक्या कुत्र्यांचे आणि मांजरींचे वेळोवेळी नसबंदी करण्यासाठी अशासकीय संस्थांची मदत करा, ज्यामुळे भटक्या प्राण्यांच्या संख्येत मर्यादेबाहेर वाढ होणार नाही. ते जिथे आढळले होते तिकडेच पुन्हा पोहोचवले जाण्याची खबरदारी घ्या.

१५. झाडे लावा आणि हरितसंपत्ती वाढवण्यात आपले योगदान द्या.

तुमची शाळा या सगळ्यामध्ये कसे काम करत आहे, त्याबद्दल तुम्ही आम्हाला कळवल्यास; तुम्ही पिटा–इंडियाच्या दयाळू शाळा पुरस्कारासाठी पात्र ठराल. वरील पायऱ्यांतील पहिल्या सहा पायऱ्या अनुसरण करणाऱ्या शाळा आपोआप पात्र होतील. काही प्रश्न अथवा टिप्पण्या असल्यास त्या तुम्ही Info@compassionatecitizen.org वर आम्हाला पाठवू शकता.







COMPASSIONATE CITIZEN